# मध उत्पादनात भारताची आघाडी



भारतामध्ये मध उत्पादनात मागील दशकामध्ये चांगली प्रगती झाली आहे. अनेक सेवाभावी तसेच खासगी संस्थांबरोबरच सरकारी संस्थांच्या प्रयत्नांतून देशामध्ये मधुक्रांतीला खऱ्या अर्थाने सुरुवात झालेली दिसते. मागील तीन वर्षांपासून भारत सरकारच्या वतीने मधुक्रांतीसाठी विशेष प्रयत्न केले जातात. देशाचे पंतप्रधान तसेच अर्थमंत्री यांच्याकडून याबाबत अनेकदा उल्लेख झाला आहे. या सर्वांच्या प्रयत्नांतून आज देशामध्ये मधाचे उत्पादन १.२५ लाख टनांपर्यंत पोहोचले आहे. जगामध्ये एकूण १९.३० लाख टन मधाचे उत्पादन मिळते. त्यापैकी चीनमध्ये पाच लाख टन मधाचे उत्पादन होत असून, चीन आज सर्वात जास्त मध तयार करणारा देश आहे. भारतानेही मागील दशकामध्ये यात प्रगती केल्यामुळे आज भारत जगामध्ये पाचव्या क्रमांकावरील मध उत्पादक देश झाला आहे. २००५-०६ मध्ये देशामध्ये फक्त ३५,००० टन मधाचे उत्पादन होते. म्हणजेच मागील १५ वर्षांमध्ये मधाचे उत्पादन ३.५ पटीने वाढले आहे. वाढलेल्या मध उत्पादनालाच 'मधुक्रांती' असे म्हटले जाते. जगामध्ये चीन, तुर्की, अर्जेंटिना, इराण, युक्रेन, भारत, अमेरिका, रशिया, मेक्सिको हे सर्व महत्त्वाचे देश आहेत, जेथे मधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते.



जागतिक अहवालानुसार जगातील एकूण ९.२२ कोटी मधमाश्यांच्या वसाहतींपैकी १.३० कोटी वसाहती भारतात (मधपालकांकडील तसेच जंगलातील एकूण वसाहती) असून मधमाश्यांच्या सर्वाधिक वसाहती असलेला भारत हा एक नंबरचा देश आहे. चीनमध्ये ९१ लाख वसाहती असूनही त्यांचे मधाचे उत्पादन ४.५० लाख टन आहे. भारतामध्ये मधमाश्यांच्या वसाहती जास्त असल्या तरी आजही पाहिजे त्या प्रमाणात मधमाशी पालनाचे व्यापारीकरण झालेले नाही. देशामध्ये आजही फक्त ९५९१ नोंदणीकृत मधमाशी पालक असून त्यांच्याकडे १५.३२ लाख वसाहती आहेत. महाराष्ट्राचा विचार केला तर फक्त ६६ नोंदणीकृत मधमाशी पालक असून त्यांच्याकडे ७९६७ मधमाश्यांच्या वसाहती आहेत. आजही देशामध्ये उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, बिहार, राजस्थान या राज्यांमध्ये नोंदणीकृत मधपाळ आणि त्यांच्याकडे असलेल्या मधमाश्यांच्या वसाहती जास्त प्रमाणात आहेत. भारतातून अमेरिका, संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया आणि कतार यासारख्या देशांमध्ये वर्षाकाठी ५५ ते ६० हजार टन मधाची निर्यात होऊन ६०० ते ७०० कोटी रुपयांचे निर्यातमूल्य मिळते. जगातील इतर देशांबरोबर तुलनात्मक विचार केला तर चीन हा जगातील सर्वात मोठा मधाचा निर्यातदार असून या एका देशाचा वाटा ११.८ टक्के आहे. यापाठोपाठ युक्रेन, पोलंड, न्युझीलंड, हंगेरी यासारख्या अत्यंत छोट्या देशांचा क्रमांक लागतो. जगातील एकूण निर्यातीमध्ये भारताचा वाटा फक्त ५ टक्के असून निर्यातीमध्ये ६ वा क्रमांक लागतो. यावरून एक लक्षात आले असेल की भारताचा मधमाशी वसाहतींमध्ये पहिला क्रमांक, मध उत्पादनामध्ये पाचवा क्रमांक आणि मध निर्यातीमध्ये सहावा क्रमांक आहे.

भारतामध्ये मध उत्पादनाला तसेच निर्यातीसाठी फार मोठी संधी आहे. एक तर आपल्या देशामध्ये मधाचे

सेवन अत्यंत कमी केले जाते. १३५ कोटी लोकसंख्या असलेल्या देशामध्ये फक्त ५० ते ६० हजार टन मधाचे सेवन होते. यावरून मधाचा किती कमी वापर होतो हे लक्षात येईल. आज रोजगाराच्या इतर संधी कमी होत असताना मधमाशी पालन व्यापारी पद्धतीने केले तर नक्कीच मोठ्या प्रमाणात रोजगार मिळू शकतो. देशामध्ये पश्चिम बंगालमधील सुंदरबनचा मध अत्यंत मधुर असून त्याला जगामध्ये मोठी मागणी आहे. अर्थात यासारखी अनेक उदाहरणे प्रत्येक राज्यामध्ये आहेत. सह्याद्री पर्वताच्या रांगा असोत की निलगिरी हिल्स, प्रत्येक ठिकाणी नैसर्गिक मधमाशी पालनाला मोठा वाव आहे. तसेच प्रत्येक राज्यामध्ये विविध पीक पद्धतींमुळे तेथेही मधमाशी पालन मोठ्या प्रमाणात होत आहे आणि पुढेही मोठा वाव आहे. भारतामध्ये मधमाशीच्या उपलब्ध असलेल्या वसाहती, एकूण पिकाखालील तसेच जंगलांखालील क्षेत्र यांचा विचार केला तर देशामध्ये कमीत कमी ७ लाख टन मधाचे उत्पादन सहज घेता येईल. अर्थात यासाठी व्यापारी तत्त्वावर मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे.




'हिमालयन इन्स्टिटट्यूट ऑफ बायोसेफटी टेक्नॉलॉजी'च्या शास्त्रज्ञांच्या म्हणण्यानुसार आज मधमाश्या पालनासाठी पारंपरिक पोळी आहेत त्यामध्ये सुधारणा करून नवीन पद्धत विकसित केली, तर आहे त्या वसाहतींतून कमीत कमी दुप्पट उत्पादन वाढविता येते. मधमाशी पालन जोपर्यंत व्यापारी तत्त्वावर मोठ्या प्रमाणात सुरू होत नाही तोपर्यंत त्याचा पाहिजे त्या प्रमाणात संशोधन, प्रचार आणि प्रचार होणार नाही. महाराष्ट्राचा विचार केला तर मधमाशी पालनामध्ये महाराष्ट्र फारच पिछाडीवर आहे. महाराष्ट्रामध्ये लाखो वसाहतींचे सहजपणे संवर्धन करून मधाचे उत्पादन वाढविता येईल. परंतु आज फक्त हजारोंच्या संख्येत मधमाश्यांच्या वसाहती आहेत. पुढील कमीत कमी २५ ते ३० वर्षे मधमाशी पालनाच्या फार मोठ्या संधी राहणार आहेत याचा विचार करून, या व्यवसायाकडे आजच्या तरुणांना आकर्षित करण्याची गरज आहे.

**(सौजन्य: 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**

---


# मधमाशी चावली? : करा घरगुती उपाय



खरं तर मधमाशी स्वत:हून कोणालाही चावत नाही कारण तिला माहीत असतं की, एकदा चावली तर तिला तिचा जीव गमवावा लागतो. मधमाशी चावताना ती दुसऱ्यांच्या शरीरामध्ये जो काटा घालते त्यासोबत, तिच्या पोटाच्या पाठीमागील बाजूला असलेला तसेच काट्याला जोडलेला जो भाग असतो त्यात असलेली विषाची पिशवी मधमाशीच्या शरीरापासून तुटून काट्यासोबत तिच्या शरीरापासून वेगळी होऊन तुटून पडते. त्यामुळे मधमाशी चावली म्हणजे काही वेळेतच तिचा मृत्यू अटळ असतो. तेवढ्या काळातही ती आपल्या शत्रूसोबत झुंज देत असते. एक तर ती आपल्या वसाहतीमध्ये निरोप पाठवून शत्रूची चाहूल देते आणि दुसरी बाब म्हणजे शरीरात काटा नसला, तरी शत्रूला घाबरविण्यासाठी त्याच्याभोवती फिरत राहाते. मधमाशी स्वत: होऊन कधीही कोणावर आक्रमण करत नाही. परंतु ज्यावेळी तिला असे वाटले की समोरची व्यक्ती/ प्राणी आपल्याला धोकादायक ठरू पाहतो आहे, त्याचवेळी ती आक्रमण करते.

मधमाशीच्या पोटाच्या शेवटी असलेल्या पिशवीमध्ये जे विष असते त्याला 'बी व्हेनम' म्हणतात. हे विष दुसऱ्यांच्या शरीरामध्ये सोडण्यासाठी जो काटा असतो त्याला बी स्टिंग म्हणतात. मधमाशीच्या जातीनुसार तिच्या शरीरामध्ये वेगवेगळ्या स्वरुपात विष असते. पहिल्या प्रकारच्या ट्रायगोना किंवा डॅमर बी जातीच्या मधमाशीमध्ये विषही नसते आणि काटाही नसतो. म्हणून या अत्यंत लहान माशीला 'स्टिंगलेस बी' असे म्हटले जाते. दुसऱ्या प्रकारच्या ॲपिस फ्लोरिया, जिला लिटल बी किंवा 'फुलोरी माशी' म्हटलं जातं, तिच्यामध्येही अत्यंत कमी प्रमाणात विष असतं. ती लहान झाडांवर आपले पोळे बनविते आणि अनेकदा आपण या

मधमाशीचे पोळं काढून मध गोळा करतो. या प्रकारच्या अनेक माश्या चावल्या तरी त्याचा जास्त परिणाम होत नाही, कारण तिच्यामध्ये विषाचे प्रमाण अत्यंत कमी असते. तिसऱ्या प्रकारची माशी म्हणजे इंडियन बी किंवा सातेरी माशी. या माशीला एपिस सेरेना इंडिका असेही म्हटले जाते. ही मधमाशी फुलोरी मधमाशीपेक्षा मोठी असते तसेच तिच्यापेक्षा थोडीशी रागीट असते. या मधमाश्यांना जास्त त्रास दिला किंवा हाताळताना अयोग्य पद्धतीने हाताळले तर त्या चावतात. चौथा प्रकार प्रमाणे एपिस मेलिफेरा. हिला इटालियन बी असेही म्हटले जाते. ही माशी सातेरी मधमाशीपेक्षा मोठी असते परंतु सातेरीपेक्षा ही माशी शांत आहे. मोठी मधमाशी, जास्त मध उत्पादन आणि शांत स्वभाव यामुळे मध उत्पादनासाठी ही मधमाशी जगामध्ये सर्वात जास्त प्रमाणात वापरली जाते. पाचव्या प्रकारची मधमाशी म्हणजे एपिस डॉरसेटा. या मधमाशीलाच 'आग्या मधमाशी' असे म्हटले जाते. ही सर्वात मोठी मधमाशी असून, अत्यंत रागीट आणि आक्रमक आहे. या मधमाशीच्या शरीरात विषाचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे जास्त मधमाश्या चावल्या तर ते माणसाच्या किंवा इतर प्राण्यांचा अंत करू शकतात. म्हणूनच या मधमाश्या व्यापारी तत्त्वावर पाळता येत नाहीत. या सर्व बाबींवरून एक लक्षात आले येते की कोणतीही मधमाशी चावली किंवा किती मधमाश्या चावल्या तर त्यावर कोणता उपाय केला पाहिजे, ही माहिती असणे महत्त्वाचे आहे.



मधमाशीचा डंख (चावा) घेण्याची जी पद्धती आहे, तिला 'बी व्हेनम थेरपी' म्हणतात. ही थेरपी फक्त डॉक्टरांच्याच सल्ल्याने आणि देखरेखीखाली जास्त फी आकारून केली जाते. म्हणून आपण स्वत: प्रयोग न करता मधमाशी चावल्यानंतर काय घरगुती उपाययोजना केल्या पाहिजेत, त्यांची माहिती घेणे गरजेचे आहे. ज्यावेळी मधमाशी चावते त्यावेळी तिचा काटा आणि त्याला जोडलेली विषाची पिशवी हळूच नखाच्या सहाय्याने किंवा आपल्या खिशात असलेले कोणतेही कार्ड (ATM Card/ Pan Card) किंवा त्यासारख्या जाड प्लॅस्टिकच्या सहाय्याने खरडून काढावी. जेणेकरून काटा आणि पिशवी शरीरापासून बाजूला होईल. डंख मारलेल्या ठिकाणी आग होते तसेच सुजते. म्हणून त्यावर बर्फ फिरवावे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे मधमाशीचे विष हे आम्लधर्मीय असते. या आम्लाची तीव्रता कमी करायची असेल तर त्यावर अल्कधर्मीय वस्तू वापरणे गरजेचे असते. आपल्या घरामध्ये असलेला खाण्याचा सोडा किंवा व्हिनेगर डंख मारलेल्या ठिकाणी लावावा तसेच टूथपेस्टचा वापरही डंख मारलेल्या ठिकाणी करता येतो. मधमाशीच्या डंखामुळे शरीरातील दाहकता वाढते. त्या ठिकाणी जास्त आग होते. हे कमी करण्यासाठी डंख मारलेल्या ठिकाणी बटाटा किंवा कांदा यांच्या फोडी ठेवाव्यात. कारण या दोन्हींमध्ये दाहकता कमी करण्याचे गुणधर्म असतात. लसणाची पेस्ट तयार करूनही चावलेल्या ठिकाणी लावता येते. यामुळे लवकर बरे वाटते. मधमाशी चावलेल्या ठिकाणी पपईचा गर लावल्यास पपईमध्ये असलेल्या पेपेन आणि इतर घटकांमुळे शरीराची दाहकता कमी होते. घरामध्ये लव्हेंडर ऑईल असेल तर डंख मारलेल्या ठिकाणी याचा वापर करावा. यामध्ये दाहकता कमी करण्याचा गुणधर्म फार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे बी व्हेनमचा त्रास कमी होऊन दाहकता कमी होते. आपल्या घराजवळ कोरफडीचे झाड असेल तर या झाडाचे पान तोडून त्याचा गर मधमाशी चावलेल्या ठिकाणी लावला तर दाहकता कमी होते.

अशा प्रकारच्या अनेक वस्तूंचा वापर करून मधमाशीच्या चावण्यामुळे शरीराची आग होणे, खाज येणे, सूज येणे किंवा चक्कर येणे यासारख्या समस्या कमी करता येतात. अर्थात आपण घराजवळ नसू आणि वरील कोणतीही बाब आपल्याजवळ नसेल तर मातीचा चिखल तयार करून त्याचा लेप लावावा. तो लेप डंख मारलेल्या ठिकाणी कमीत कमी १५-२० मिनिटे राहिला पाहिजे. मधमाशी चावल्यानंतर न घाबरता योग्य उपाययोजना करणे गरजेचे असते. काही व्यक्तींना बी व्हेनमची ॲलर्जी असते. त्यांना जास्त त्रास होऊ शकतो, थोडक्यात मळमळ, चक्कर येतात, हृदयाचे ठोके वाढतात, घशाला कोरड पडते. अशा वेळी प्रथमोपचार करून डॉक्टरांकडे जाणे योग्य. वरीलपैकी कोणतेही लक्षण नसेल तर मधमाशी चावल्यानंतर घरचे घरीच उपाय करू शकता.

**(सौजन्य: 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**